# रे.क.नं. ७०/२०१४ मध्ये निशाण १०१ खालील आदेश.

प्रतिवादी क्रमांक १० ने प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकतीमधील त्याचा असणारा ०.७७ आर प्रतिवादी क्रमांक ७ यांचे नांवे हस्तांतरीत करण्यास परवानगी मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाला यातील वादी यांनी याच अर्जावरती म्हणणे देवून त्याची हरकत नसल्याचे कळविले आहे.

३. यातील प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक १० हिला एकूण सहा वारस आहेत. पैकी प्रतिवादी क्रमांक ६ ही तिची जनक मुलगी आहे. प्रतिवादी क्रमांक १० च्या मुलांनी दुसरा दिवाणी दावा दाखल करुन तडजोड करुन घेतली आहे. प्रतिवादी क्रमांक १० च्या वारसामध्ये प्राथमीक दृष्टया वाद नसल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्रमांक १० ही प्रतिवादी क्रमांक ६ या आपल्या जनक मुलीला तिचा असणारा हिस्सा हस्तांतर करुन मागत असल्याचे स्पष्ट होते. वादीचा दावा हा वाटपासाठीचा आहे. वादी हा दाव्याचा मालक आहे. वादीला सदर हस्तांतरणाबाबत हरकत नसल्याचे त्याने लिहून दिले आहे. त्यामुळे अशा हस्तांतरास परवानगी देणे हिताचे दिसून येते. तरी देखील वादीचा दावा वाटपाचा असल्याने व होणा–या अंतीम निर्णयास वादी, प्रतिवादी सर्व बांधील असणार आहेत. त्यामुळे प्रस्तुत अर्जदारने मागितलेले हस्तांतरण अंतीम निर्णयाच्या अधीन असणार आहे. तसेच प्रतिवादी क्रमांक १० चे वारस व त्यांचे हक्क हितसंबंध यास अधिन राहून सदरचे हस्तांतरणास संमत्ती दिलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादीचा अर्ज अंतीम निर्णयास अधिन राहून मंजूर करणे योग्य होणार आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे

आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश.</u>**

अर्जदारचा नि.१०१ चा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

पेठवडगाव
दिनांक ०३.०५.२०१७

सही/-
(सं.मा.जाधव),
दुसरे सह. दिवाणी न्यायाधिश,क.स्तर.
पेठवडगांव.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs. Rajashri Rajendra Sawant (L.G.) |
| Name of Court | Shri. S.M.Jadhav, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Peth Vadgaon |
| Date of Dictation | 03-05-2017. |
| Judgment signed by the P.O. on | 03-05-2017. |
| Judgment/Order uploaded on | 06-05-2017. |